# हापूस



## मराठी शिक्षक पुस्तिका

# ४


**संकल्पना**
अनुज गुप्ता

**लेखिका**
मिनाक्षी आनंदा पवार

**संपादक**
विद्या रायकर



Harbour Press®
INTERNATIONAL

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | राणी लक्ष्मीबाई | ३ |
| २. | दसरा | ४ |
| ३. | भारतमाता माझी लावण्याची खाण | ५ |
| ४. | आई व तिची मुले | ६ |
| ५. | शब्द–अभंगवाणी | ८ |
| ६. | मास्टर ब्लास्टर सचिन | ९ |
| ७. | श्रम | ११ |
| ८. | निसर्गाचे एक वरदान–वटवृक्ष | १२ |
| ९. | भरजरी ग पितांबर | १४ |
| १०. | सन्मान | १५ |
| ११. | माझा गौरवशाली महाराष्ट्र | १७ |
| १२. | अशी ही दोन फुलांची कथा | १८ |
| १३. | एक महान समाजसेविका–मदर तेरेसा | २० |
| १४. | वाचाल तर वाचाल | २१ |
| १५. | व्याकरण | २३ |

## १ राणी लक्ष्मीबाई

✦ **काव्य परिचय**

- राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनाविषयी पाठात थोडक्यात परिचय करून दिलेला आहे.

✦ **उद्देश**

- राणी लक्ष्मीबाईबद्दल विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- देशासाठी लढलेल्या वीरांगनांची ओळख करून देणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाची भावना निर्माण करणे.
- वीरकथेत मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना राणी लक्ष्मीबाई यांच्याविषयी निश्चितच महिती असणार. त्यामुळे विद्यार्थ्यांना माहीत असलेली माहिती प्रथम काढून घेण्याचा प्रयत्न करणे.

उदा.- १) राणी लक्ष्मीबाईचे लहानपणीचे नाव?
२) आई-वडिलांचे नाव?
३) त्यांनी कोणकोणते शिक्षण घेतले होते?
४) लढाईचे शिक्षण त्यांना कोणी दिले?
५) त्यांचे लग्न कोणाबरोबर झाले?
६) त्यांनी मुलाला दत्तक का घेतले?
७) इंग्रजांशी त्यांना लढाई का करावी लागली?

अशा प्रश्नांतून पाठात असलेली माहिती विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावी. नंतर पाठ्यपुस्तकातील पाठ शिकवावा. पाठाखालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना कोणत्याही एका वीरांगनेविषयी माहिती मिळवून प्रकल्प कार्य करण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. मनुताई नानासाहेब पेशवे, रावसाहेब पेशवे या दुसऱ्या बाजीरावाच्या दत्तक मुलासोबत ब्रह्मावती येथे वाढली. मनुताईला लिखाण व वाचनाबरोबरच मर्दानी शिक्षणही दिले. घोडेस्वारी, तलवारबाजी, बंदुक चालविणे, पिस्तुल, दांडपट्टा, जांबिया चालविणे यांचे देखील शिक्षण दिले.

२. १८५४ मध्ये ब्रिटिशांनी झाशीचे संस्थान खालसा करून टाकले. झाशीच्या जनतेला उद्देशून जाहिरनामा काढण्यात आला. त्यानुसार दत्तक विधान नामंजूर करून झाशी संस्थान ब्रिटिश सरकारात विलीन करण्यात आले. हे वृत्त ऐकताच राणी लक्ष्मीबाई चवताळल्या.

**प्र २.** १. आपल्या पराक्रमाचा ठसा पूर्ण जगाच्या इतिहासावर झाशीची राणी लक्ष्मीबाई ह्यांनी उमटवला.

२. राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म १९ नोव्हेंबर, १८३५ साली झाला.

३. वयाच्या सातव्या वर्षी मनुताईचा विवाह झाशी संस्थानाचे अधिपती गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी झाला.

४. लग्नानंतर मनुताई 'झाशीची राणी' म्हणून संबोधल्या जाऊ लागल्या.

**प्र ३.** १. ब्रिटिश  २. गंगाधरराव नेवाळकर
३. मोरोपंत  ४. मेजर एलिस

**प्र ४.** १. लग्न  २. तब्येत  ३. राग
४. शौर्य  ५. अनादर

**प्र ५.** १. ढ, मठ्ठ  २. अशांत  ३. सौभाग्यवती
४. प्रजा  ५. नामंजूर

**प्र ६.** १. घोडी  २. राजा  ३. वाघ

**प्र ७.** १. एक  २. अनेक  ३. एक
४. अनेक  ५. एक

**प्र ८.** १. गंगाधरराव - गंगा, धर, राव, गंध, वर.
२. रावसाहेब - राव, साहेब, वसा, बरा.
३. बाजीराव - बाजी, राव, बारा, जीव
४. दामोदरराव - दामोदर, राव, मोर, दर, दार, वर

## २ दसरा

### ✦ पाठ परिचय

- पाठात दसरा या सणाविषयी माहिती दिलेली आहे.
  - दसरा सण कधी साजरा करतात?
  - दसरा सण साजरा करण्यामागच्या पौराणीक कथा,
  - पौराणिक काळापासून दसरा या सणाचे महत्त्व,
  - दसरा सणाला कशाचे पूजन करतात व का?

  या सर्वांची माहिती पाठात आलेली आहे.

### ✦ उद्‌देश

- विद्यार्थ्यांना पारंपरिक सणाची माहिती व्हावी.
- विद्यार्थ्यांना दसरा सणामागील पौराणिक कथा समजावी.
- मराठी सणाची माहिती व महत्त्व समजावणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात मराठी विषयाबद्‌दल आपुलकी निर्माण व्हावी.

### ✦ अध्यापन कृती

- वर्गात मराठी/महाराष्ट्रीय विद्यार्थी असतील तर त्यांच्याकडून दसरा हा सण कसा साजरा करतात ते काढून घेणे.
- आपट्याची पाने, सरस्वतीचे दसऱ्याला पाटीवर काढले जाणारे चित्र इत्यादी शैक्षणिक साधनाचा वापर करावा व त्याचे महत्त्व व त्यामागील पौराणिक कथा विद्यार्थ्यांना सांगावी.
- नंतर पाठ्यपुस्तकातील पाठ हा कठीण शब्दांचा अर्थ सांगत सविस्तर शिकवावा. पाठाखालील स्वाध्याय कार्य करवून घेणे.

### ✦ सामूहिक कार्य

- विद्यार्थ्यांना कोणताही एक सण व तो सण साजरा करण्यामागची पारंपरिक कथा यावर प्रकल्प कार्य करण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. दसरा या सणाची परंपरा फार पूर्वीपासून आहे. याची काही उदाहरणे–

विजयादशमी याच दिवशी रामाने रावणास मारले, देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला, अर्जुनाने आज्ञातवास संपल्यामुळे शमीच्या झाडावर बांधून ठेवलेले आपले शस्त्र घेऊन कौरवांचा पराभव केला, शिवाजी महाराजांनी प्रतापगड किल्ल्यावर भवानी देवीच्या उत्सवाला याच दिवशी शुभारंभ केला. बाजीराव पेशवे याच दिवशी पुढच्या स्वारीचे बेत कायम करीत असत. अनेक शूर पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राज्यावर स्वारी करण्यास जात असे, इत्यादी.

**प्र २.** १. दसरा या सणाला 'विजयादशमी' या नावानेही ओळखले जाते.

२. देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला.

३. दसऱ्याला गौतम बुद्धांचा जन्म झाल्यामुळे बौद्ध धर्मियांना 'दसरा' हा दिवस अत्यंत पवित्र आहे.

४. ऋषींनी कौत्साला 'चौदा कोटी सुवर्णमुद्रा' आणावयास सांगितल्या.

५. रघुराजाने 'विश्वजीत' यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता.

**प्र ३.** १. देवदत्त २. रघुराजा ३. रघुराजा

**प्र ४.** १. फार – वार, तार, दार

२. खूप – तूप, सूप, धूप

३. नाव – पाव, डाव, हाव

**प्र ५.** १. उत्सव २. मास ३. नृप

४. पाहुणा ५. पर्जन्य

**प्र ६.** १. रात्र २. गाडी ३. टेकडी

४. गुढीपाडवा ५. मठ्ठ

**प्र ७.** १. राक्षसीण २. मुलगी ३. राणी

४. विद्यार्थीनी ५. देव

**प्र ८.** १. महिने २. घर ३. दिवस

४. झाडे ५. गड

## ३ भारतमाता माझी लावण्याची खाण

✦ **काव्य परिचय**

- 'भारतमाता माझी लावण्याची खाण' या कवितेत भारतमातेबद्दल असलेला अभिमान व्यक्त करताना भारतमातेच्या उन्नतीसाठी मुले (कवी) काय करणार आहे हे कवितेत वर्णिले आहे.

✦ **उद्देश**

- भारतमातेविषयी अभिमान विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.
- भारतमातेविषयी म्हणजेच आपल्या देशाविषयी कर्तव्याची जाणीव निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून भारत देशाबद्दलचे प्रेम किंवा त्यांच्या मनात भारत देशाबद्दल काय भावना आहेत ते काढून घेणे.

- कवितेचा अर्थ सांगताना कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून काढण्याचा प्रयत्न करावा.
- कवितेखालील स्वाध्याय कार्य सोडवून घेणे.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांचे १०-१० चे गट करावे व त्यांच्याकडून कविता तालासुरात म्हणवून घ्यावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. साने गुरूजींनी लावण्याची खाण भारतमातेला म्हटले आहे.

२. जगात भारतमातेला पहिले स्थान मिळावे म्हणून या जगातील ज्या पूर्वीपासून चालत आलेल्या अयोग्य रूढी छाटून टाकीन असे कवी म्हणतात.

३. कवी कवितेतून सर्वस्वाचे दान करण्याची शपथ घेत आहेत.

४. साने गुरूजींचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने होय.

५. या कवितेतून साने गुरूजी देशप्रेमाची भावना व्यक्त करतात.

**प्र २.** 'भारतमाता माझी लावण्याची खाण' या कवितेचे कवी साने गुरूजी आहे. कवितेत कवी सांगतात की भारतमाता ही लावण्याची म्हणजे सुंदरतेची खाण आहे, सौंदर्याचा उगम आहे. मी सदैव या भारतमातेचे गुणगान गाणार आहे.

मी भारतमातेसाठी निर्भयपणे एक ठाम निर्णय घेतला आहे. मी देशासाठी माझे प्राण ही देईन असे सतीचे वाण घेतले आहे.

भारतमातेच्या प्रगतीसाठी मी सर्वप्रकारचे जातीभेद, रूढी परंपरांसारख्या ज्या गोष्टीमुळे वाद, भांडण होतात अशा गोष्टी जाळून टाकणार आहेत. अशा गोष्टी नष्ट करणार आहेत. भारतमातेला जगामध्ये पहिले स्थान मिळवून देणार.

मी परंपरेनुसार चालत असलेल्या गोष्टी ज्यामुळे आघात झालेला आहे त्या गोष्टी दूर करणार ही भेट तिला देईन. भारतमातेला मी माझ्या हाताने पवित्र विचार, नवीन प्रगतीच्या योजनेने स्नान घालणार आहे या गोष्टी भारतमातेला प्रदान करणार आहे.

मी माझ्या भारतमातेसाठी माझे सर्वस्व दान करीन अशी घोर शपथ घेत आहे. मी मातेला मोक्ष-अमृतपान देऊन नवीन प्रगतीच्या नवीन विचारांनी घडवणार आहे.

**प्र ३.** 'भारतमाता माझी लावण्याची खाण' या कवितेचे कवी साने गुरूजी आहेत. वरील ओळीमार्फत ते सांगतात की भारतमातेच्या प्रगतीसाठी मी सर्वप्रकारचे जातीभेद, रूढी परंपरांसारख्या ज्या गोष्टीमुळे वाद, भांडण होतात अशा गोष्टी जाळून टाकणार आहेत. अशा गोष्टी नष्ट करणार आहेत. भारतमातेला जगामध्ये पहिले स्थान मिळवून देणार.

**प्र ४.** १. जीव  २. आई  ३. कर

४. आंघोळ  ५. वहिवाट  ६. शपथ

**प्र ५.** १. उदया  २. अभय  ३. घेईन

**प्र ६.** १. निर्भय  २. हातांनी  ३. प्राण

४. बाण  ५. भारतमाता

## ४ आई व तिची मुले

✦ **पाठ परिचय**

- पाठ साने गुरूजींच्या श्यामची आई मधील आहे. एक गरीब घराची परिस्थिती दाखविली आहे. एक गरीब आई सणाच्या दिवशी आपल्या मुलांना पुरणपोळी खाऊ घालण्यासाठी कशी

जिन्नसांची जमवाजमव करते; पण तिच्या घरात कोंबडी व तिची पिल्ले घुसल्याने तिची सर्व धडपड वाया जाते पण तरीही जे जिन्नस राहिलेय त्यात मुलांसाठी गोड पदार्थ बनवते. याची सुंदर कथा पाठात वर्णिलेली आहे.

## ✦ उद्‌देश

- सोन गुरूजींबद्‌दल विद्‌यार्थ्यांना माहिती करून देणे.
- विद्‌यार्थ्यांना गरीब परिस्थिती व त्यांच्या राहणीमानाची ओळख करून देणे.
- पाठातून प्राणीमात्रांवर दया करणे; तसेच दुसऱ्यांच्या आनंदात आनंद मानण्याची भावना विद्‌यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.

## ✦ अध्यापन कृती

- पाठातील संपूर्ण कथा ही गोष्टी रूपाने सांगावी. त्यावर प्रश्न विचारावेत. नंतर पाठ्‌यपुस्तकातील पाठ विद्‌यार्थ्यांकडून वाचून घेत त्याचा अर्थ विद्‌यार्थ्यांनाच सांगण्यास सांगावा.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. आईने दुकानात जाताना मुलांना सांगितले की येथे ही परळात कणीक आहे. मी ह्या घडवंचीवर ती ठेवून जाते. तुम्ही घरातच बसा दार उघडे टाकून बाहेर नका जाऊ, कोंबडा-कुत्री घरात शिरतील मी लवकरच गूळ घेऊन येते. आज तुम्हाला पुरणपोळी करणार आहे.

२. आई दुकानात गेल्यानंतर त्यांच्या बोळीतील मुले बाहेर आली व त्यांना हाका मारू लागली. ती त्यांना हिणवू लागली, आग्रह करू लागली. शेवटी घरातील मुले बाहेर आली. ती झोपडीचे दार नीट लावायला विसरून गेली व एक कोंबडी आपल्या पिलांसोबत त्या झोपडीत शिरली व घडवंचीवर ठेवलेली कणीक चोचीने खाण्यास सुरूवात केली.

३. आई दुकानात गेल्यावर त्यांच्या बोळीतील मुले बाहेर आली व घरातील मुलांना हाका मारू लागली, आज सणाचा दिवस असे रे काय बसता! चूलकोंबड्‌यासारखे? चला बाहेर खेळायला असे त्यांना हिणवू लागली. आग्रह करू लागली; म्हणून मुले खेळायला गेली.

४. आई रागवल्यावर मुले रडू लागलीत. त्यांचा सण, पुरणपोळीचा सर्व आनंद मावळला. आई रागावली तर कोणाकडे जावे? ती मुसमुसत रडत होती. आईचे गोड शब्द ऐकण्यासाठी ती भुकेलेली होती, पोटातली भूक पूर्णपणे निघून गेली होती.

**प्र २.** १. सणाच्या दिवशी रामाच्या घरी श्रीखंड व गोविंदच्या घरी पुरणपोळी बनणार होती.

२. बोळीतल्या मुलांनी हाका मारल्या; म्हणून मुले त्यांच्याबरोबर खेळायला झोपडी बाहेर पडली. आईने सांगितलेले सगळे विसरली व दारही बंद केले नाही.

३. आई दुकानातून परत आली व झोपडीत शिरली तेव्हा तिला बघून कोंबडी घाबरली.

४. मुले आईचे गोड शब्द ऐकण्यासाठी भुकेलेली होती.

५. सणावारी आपली मुले रडतात हे बघून आईचे हृदय भरून आले.

६. आई सणाच्या दिवशी मुलांसाठी पुरणाची पोळी करणार होती.

**प्र ३.** १. आई मुलांना म्हणाली

२. बोळीतील मुले घरातील मुलांना म्हणाली

३. मुले आईला म्हण/ाली

**प्र ४.** १. क्षणाचाही विसावा नसणे - कामात व्यस्त असणे.

सुमनला पोळीभाजी केंद्र सुरू केल्यापासून क्षणाचाही विसावा नसतो.

२. आग्रह करणे – हट्ट धरणे, हेका धरणे

मी शिक्षकांना माझ्या डब्यातील पोळीभाजी खाण्यासाठी आग्रह करू लागले.

३. खिन्नपणे उभे राहणे – उदास होणे.

खूप वेळ झाला तरी मिनल खेळायला आली नाही; म्हणून सुशीला तिची वाट बघत खिन्नपणे उभी राहिली.

४. हृदय भरून येणे – मन/अंत:करण भरुन येणे. / गदगदून येणे.

चूक नसतानाही मनोजला आपण खूप बडबडलो हे कळताच बाबांचे हृदय भरून आले.

५. ओशाळणे – लाज वाटणे.

आईकडे परत पैसे मागतांना मी ओशाळली.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ५.** | १. कुटीर, खोप, कुटी | | २. नेहमी, सतत | | ३. स्मरण | |
| | ४. फिरणे, भटकणे | | ५. दीन | | ६. भाग्य | |
| **प्र ६.** | १. महाल | | २. विस्मरण | | ३. निराधार | |
| | ४. कडू | | ५. प्रेम | | ६. आत | |
| **प्र ७.** | १. अनेकवचन | | २. एकवचन | | ३. एकवचन | |
| | ४. अनेकवचन | | ५. एकवचन | | | |

## ५ शब्द-अभंगवाणी

### ✦ काव्य परिचय

- 'शब्द' ह्या अभंगवाणीतून संत तुकाराम महाराज सांगतात की आपल्या मुखावाटे निघणारे शब्द, वाणी हिच आपली खरी संपत्ती आहे. कोणाशीही बोलताना कशाप्रकारे शब्द सांभाळून बोलले पाहिजे; नाहीतर काय नुकसान होऊ शकते, शब्दांचे म्हणजेच वाणीचे महत्त्व अभंगवाण ीत सांगितलेले आहे.

### ✦ उद्देश

- संत तुकाराम महाराजांविषयी विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- तोंडातून बाहेर पडणारे शब्द म्हणजेच वाणीचे महत्त्व समजावणे.
- अभंगवाणीतून नवनवीन चांगल्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या अंगी रूजविणे.
- मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- जर कोणाला अपशब्द केल्यामुळे कधी तुमच्यामुळे भांडण झाले आहे का? अशा सारख्या प्रश्नांतून विद्यार्थ्यांना शब्दाचे किती महत्त्व आहे ते जाणून घेणे.
- अभंग शिकविण्यापूर्वी विद्यार्थ्यांना संत तुकाराम महाराजांविषयी ओळख करून देणे.
- वाणीचे महत्त्व काय? शब्द जपून का वापरावेत? शब्द जपून वापरले नाहीत तर काय परिण ाम होतात? अशा प्रश्नांवर चर्चा करून नंतर पाठ्यपुस्तकातील अभंगवाणी समजवावी.
- अभंगवाणी खालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

### ✦ सामुहिक कार्य

- विद्यार्थ्यांना अभंगवाणी पाठांतरास देऊन त्यांच्याकडून ती तालासुरात म्हणवून घ्यावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. शब्द वापरताना तो तोलून, मोजून, मापून म्हणजेच विचारपूर्वक वापरावा असा सल्ला तुकाराम महाराजांनी दिला आहे.

२. शब्दाची ताकद सांगताना तुकाराम महाराज सांगतात की शब्द हे कातरीसारखे असतात. वेळप्रसंगी चुकीचे शब्द वापरल्याने भांडणही होतात, युद्ध होऊ शकते. काही शब्द हे दहशत, गोंधळ निर्माण करतात; पण तेच काही शब्द हे वातावरण मंगलमय करतात.

३. 'शब्द' या कवितेद्वारे संत तुकाराम महाराज सांगतात की प्रत्येक शब्दाला एक वेगळे महत्त्व आहे. शब्द हे जीवन जगण्याचे तत्वज्ञान सांगतात. तोंडावाटे निघणारे शब्द म्हणजे वाणी ही कोणत्या प्रकारे वापरली जाते त्याप्रमाणेच नातेसंबंध निर्माण होतात. काही शब्दांमुळे वाद निर्माण होऊ शकतात, तर काही शब्दामुळे झालेले वाद मिटू ही शकतात.

**प्र २.** १. तुकाराम महाराजांनी अभंगाद्वारे शब्दाचे महत्त्व आपल्याला सांगितले आहे.

२. शब्दांना धार असते म्हणून दुसऱ्यांची मने दुखवण्यांचे काम करणारे शब्द न वापरता सुईदोऱ्यासारखे मन जोडण्याचे काम करणारे मोजके शब्द वापरायला सांगितले आहेत.

३. मुद्देसुद बोलणे ही संवाद कला आहे.

४. शब्दांमध्ये ज्ञान, कर्म, भक्ती झळकले पाहिजे.

५. काही शब्दांमुळे वाद निर्माण होतात व काही शब्दांमुळे प्रेम, आनंदी वातावरण निर्माण होते; म्हणून शब्द वापरताना जागृत राहण्यास सांगितले आहे.

६. जीभेवर ताबा ठेवून सर्वांच्या सुखासाठी तुकाराम महाराजांनी वाणी जपून वापरावी ती नासू देऊ नये असे सांगितले आहे.

**प्र ३.** १. शब्द हेचि कातर। शब्द सुईदोरा।
बेतावेत शब्द। शास्त्राधारे।।

२. बोलावे बरे। बोलावे खरे।
कोणच्याही मनावर। पाडू नये चरे।।

३. शब्दांमुळे दंगल। शब्दांमुळे मंगल।
शब्दांचे हे जंगल। जागृत राहावं।।

**प्र ४.** 'शब्द' या अभंगाद्वारे तुकाराम महाराज सांगतात की शब्द वापरताना जपून वापरलेत पाहिजे. शब्द कातरीसारखे असतात त्यामुळे अनेकदा युद्ध, भांडणे होतात; पण तेच शब्द सुईदोऱ्या प्रमाणे ही काम करतात; ते मन जोडण्याचे काम करतात. त्यामुळे शब्द जपून वारण्याचा सल्ला तुकाराम महाराजांनी दिला आहे.

**प्र ५.** १. चित्त २. रान, वन ३. वाचा ४. जल ५. अवजार

**प्र ६.** १. अधर्म २. मृत्यू ३. अमंगल ४. खोटे

**प्र ७.** १. देश २. जाती ३. जंगले ४. शस्त्र ५. शब्द

**प्र ८.** १. जंगल – मंगल, दंगल २. शस्त्र – वस्त्र, अस्त्र
३. भान – मान, छान ४. धर्म – कर्म, वर्म
५. पाणी – राणी, गाणी ६. काळ – माळ, गाळ

## ६ मास्टर ब्लास्टर सचिन

✦ **पाठ परिचय**

- सचिन ह्या भारतीय क्रिकेटपटूचा जीवन व क्रिकेट विश्वातला प्रवास वर्णिला आहे.

✦ **उद्‌देश**

- विद्‌यार्थ्यांना सचिन तेंडूलकरांच्या क्रिकेट कामगिरीमधल्या प्रवासाची माहिती मिळणे.
- विद्‌यार्थ्यांना क्रिकेट या खेळाविषयी माहिती मिळणे व खेळाविषयी आवड निर्माण करणे.
- खेळाविषयक पाठामार्फत विद्‌यार्थ्यांच्या मनात मराठी  विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्‌यार्थ्यांना क्रिकेट खेळाविषयी व सचिन तेंडूलकर विषयी असलेली माहिती काढून घेणे. (सचिन तेंडूलकरचे फोटो, खेळाचे व्हिडिओ दाखवून विद्‌यार्थ्यांना अधिक माहिती देऊ शकता.)
- पाठ शिकविताना पाठातील कठीण शब्द व छोटे प्रश्न विचारावेत. पाठाखालील स्वाध्याय कार्य करवून घ्यावे.

✦ **सामुहिक कार्य**

- विद्‌यार्थ्यांना १० - १० चा गट तयार करून त्यांना आवडणाऱ्या कोणत्याही एका खेळाडूची माहिती व चित्रे जमवून प्रकल्प कार्य करण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. सचिन तेंडूलकर यांना आपल्या कुंटुबाकडून व मित्रमंडळीकडून मदत मिळाली. कारण शाळेत असतांनाच क्रिकेटचे प्रशिक्षक 'रमाकांत आचरेकर' हयांच्याकडून क्रिकेटचे धडे घ्यायला सुरुवात केली होती. शाळेत असताना त्याने आपला मित्र व सहखेळाडू असलेल्या विनोद कांबळीबरोबर 'हॅरीश शील्ड सामन्यात ६४४ धावांची अजस्त्र भागीदारी रचली.

२. प्रयत्नाने प्राप्त झालेले यश नम्रतेने टिकते हे सचिनच्या बाबतीत सत्य वाटते. सचिन हा पृथ्वीवर पाठवलेला देवदूत आहे. तो एक चमत्कार असून मी त्याला नमस्कार करते. असे २४ एप्रिल २००३ या सचिनच्या ३० व्या वाढदिवशी गानसम्राज्ञी लता मंगेशकर म्हणाल्या होत्या.

**प्र २.** १. सचिन तेंडूलकर यांचा जन्म मुंबईमध्ये एका मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात झाला.

२. सचिनला तीन भावंडे आहेत.

३. रमाकांत आचरेकर हे सचिनचे प्रशिक्षक होय.

४. सचिनने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना १९८९ साली पाकिस्थान विरुद्ध कराची येथे खेळला.

**प्र ३.** १. सचिन  २. पहिला

३. भारतरत्न  ४. १०००

**प्र ४.** १. खरे  २. किमया

३. वंदन  ४. धरणी

**प्र ५.** १. दुःख  २. कमी

३. असत्य  ४. राक्षस

**प्र ६.** १. काकी  २. बाबा

## ७ भ्रम

### ✦ पाठ परिचय

- आपण जे समजतो तेच सत्य आहे. असे समजण्यापेक्षा सत्य त्यापेक्षा काही वेगळे असू शकते ही शिकवण शिष्यांना पटवून देण्यासाठी गौतम बुद्ध एका गोष्टीचा आधार घेतात. गोष्टीत एक गरीब माणूस आपला मुलगा मरण पावला आहे हे सत्य मानून परत आलेल्या मुलाला पुन्हा गमावतो व आपले नुकसान करून घेतो याचे वर्णन केलेले आहे.

### ✦ उद्देश

- प्रत्येक गोष्टीची योग्य ती शहानिशा करणे आवश्यक आहे हे पाठाच्या आधारे विद्यार्थ्यांना समजावणे.
- आपल्या मनातील विचारांची दुसरी बाजूही समजून घेणे आवश्यक आहे हे समजावणे.
- गौतम बुद्धांची शिकवण देणे.
- गोष्टीमार्फत मराठी विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- पाठातील गोष्ट विद्यार्थ्यांना गोष्टीरूपाने सांगणे. त्या गोष्टीवरून त्यांना काय शिकवण मिळाली हे जाणून घेणे.
- नंतर पाठयपुस्तकातील पाठ विद्यार्थ्यांच्या उदाहरणांच्या साहाय्याने समजावणे कठीण शब्दांचा अर्थ समजावणे व स्वाध्याय करवून घेणे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. आपण जे समजतो तेच सत्य आहे, असे समजू नका कदाचित सत्य काहीतरी वेगळेच असू शकते. सतत डोळे उघडे ठेवा, जाणीवा जागृत ठेवा. असा गौतम बुद्धांनी उपदेश केला. गौतम बुद्धांच्या या उपदेशावर विस्ताराने सांगण्याचा त्यांच्या काही शिष्यांनी आग्रह केला; म्हणून गौतम बुद्धांनी गोष्ट सांगण्यास सुरूवात केली.

२. एका रात्री दरोडेखोरांनी गरीब व्यक्ती राहत असलेल्या वसाहतीवर दरोडा टाकला. दरोडेखोरांनी त्याच्या मुलाला बाहेर काढले. झोपडीतील सर्व सामान लुटले व त्यांनी झोपड्यांना आग लावली. त्या मुलाला घेऊन ते फरार झाले. दुसऱ्या दिवशी जेव्हा तो व्यक्ती काम संपवून घराकडे आला तेव्हा जळालेली झोपडी व त्या झोपडीत आपला मुलगा जळून खाक झाला असे त्याला वाटले व तो दुःखी झाला.

३. दरोडेखोरांनी वसाहतीवर दरोडा टाकला व सर्व झोपड्यांना आग लावली; तेव्हा त्या झोपडीत आपला मुलगा जळून राख झाला असे गरीब व्यक्तीला वाटत होते. त्यामुळेच काही वर्षांनी जेव्हा दरोडेखोरांच्या तावडीतून सुटून त्याचा मुलगा त्याच्या दराशी आला व "मी तुमचा मुलगा" असे आवाज देत दार वाजवू लागला. पण त्या व्यक्तीने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. शेजारची मुले गंमत करत आहेत असे समजून त्याने दार उघडले नाही.

**प्र २.** १. गौतम बुद्धांची शिकवण ही आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणारी व प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देणारी आहे.

२. आपला मुलगा सुरक्षित रहावा; म्हणून गरीब व्यक्ती मुलाला लवकर झोपवून बाहेरून कुलूप लावून कामावर जात असे.

३. खूप वेळ दार वाजवूनही दार न उघडल्याने मुलगा हताश होऊन पुन्हा दूर निघून गेला.

४. आपण जे समजतो तेच सत्य असते; अशा भ्रमात राहू नका असे गौतम बुद्ध सांगतात.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | गौतम बुद्ध | २. | दरोडेखोर | | |
| | ३. | गरीब व्यक्तीचा मुलगा | | | | |
| | ४. | शेजारच्या झोपडीतील मुले | | | | |
| | ५. | गरीब व्यक्ती | | | | |

**प्र ४.** १. गौतम बुद्धांची शिकवण प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देणारी आहे.

२. गावाबाहेरील एका वसाहतीत त्याची छोटीशी झोपडी होती.

३. "मी तुमचा मुलगा" असा आवाज देऊ लागला.

४. आपण जे समजतो तेच सत्य आहे असे समजू नका.

५. त्याने झोपडीचे दार आतून बंद केले होते.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ५.** | १. द्वार, दरवाजा | २. | दीन | ३. | देखावा | |
| | ४. यातना | ५. | निराशा | | | |
| **प्र ६.** | १. बंद | २. | द्वेष | ३. | कमाल | |
| | ४. गैरसमज | ५. | दुर्लक्ष | ६. | असत्य | |
| | ७. अविचार | | | | | |
| **प्र ७.** | १. झोपड्या | २. | वसाहती | ३. | दरोडे | |
| | ४. रात्र | ५. | घरे | ६. | डोळा | |

**प्र ८.** १. फरार होणे. - पळून जाणे.
पोलिसांना येताना बघून चोर फरार झाला.

२. उपदेश करणे. - सल्ला देणे.
परीक्षेत चांगले मार्क मिळवण्यासाठी शिक्षिका विद्यार्थ्यांना उपदेश करत होती.

३. हताश होणे. - नाराज होणे.
डॉक्टरची पदवी न मिळाल्यामुळे मीता खूप हताश झाली.

४. भान नसणे. - लक्ष नसणे.
अजय कसल्यातरी विचारात असल्याने वामनच्या बोलण्याकडे त्याचे भानच नव्हते.

५. दुर्लक्ष करणे. - कानाडोळा करणे.
जर आयुष्यात शांतता हवी असेल तर काही गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यास शिकले पाहिजे.

## ८ निसर्गाचे एक वरदान-वटवृक्ष

✦ **पाठ परिचय**

- पाठात भारताचा राष्ट्रीय वृक्ष-वड याची माहिती दिलेली आहे. त्यात धार्मिक, आरोग्यासाठी व पर्यावरणासाठी होणारे फायदे दिलेली आहेत.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना राष्ट्रीय वृक्षाची माहिती, उपयोग याचे ज्ञान होणे.
- वृक्षारोपणाच्या आवश्यकतेची विद्यार्थ्यांना जाणीव करून देणे.
- पर्यावरण संवर्धनाची विद्यार्थ्यांच्या मनात जागृतता निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना वडाच्या झाडाचे चित्र दाखवून त्याच्या प्रत्येक अवयवाचा काय-काय फायदा आहे, हे समजावणे.
- पाठ्यपुस्तकातील पाठातील माहिती व इतर माहितीचा आधार घेत पाठ समजवावा. पाठाखालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. ब्रह्मदेवाचे वड हे निवासस्थान आहे, अशी हिंदू धर्मियांची धारणा आहे. तसेच भगवान शिवाचेही या वृक्षावर निवासस्थान आहे. हिंदू धर्मातील स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घलतात.

२. वटवृक्षाचे अनेक फायदे आहेत. सर्वात मोठा फायदा म्हणजे वडाचे झाड खूप मोठ्या प्रमाणात प्राणवायूची म्हणजेच ऑक्सिजनची निर्मिती करतात. त्याच्या पारंब्याचा दोरी म्हणून वापर करता येतो. चिकापासून अतिशय चिकट गोंद बनवितात. पानांच्या पत्रावळी व द्रोण तयार करतात. वडाच्या झाडाची मुळे, पाने, फुले, चीक आणि साल या सगळ्यांचा औषध म्हणून उपयोग करण्यात येतो. या झाडापासून मजबूत व लवचिक लाकूड मिळते.

३. पर्यावरण्याचा ऱ्हास रोखण्यासाठी वटवृक्षाची जपवणूक केली पाहिजे. तसेच पर्यावरणाचे संरक्षण करणारी झाडे लावणे फार महत्त्वाचे आहे. आधुनिकिकरणाच्या वेळी जेव्हा झाडे तोडली जातात तेव्हा जुन्या झाडांच्या जागी काही नवीन झाडे लावली पाहिजेत.

**प्र २.** १. वटवृक्ष हे झाड पहिल्यांदा पश्चिम बंगालमध्ये दिसले गेले; म्हणून त्याला 'बेंगालेन्सिस' असे संबोधले जाते.

२. वडाच्या झाडाच्या मुळयांना 'पारंब्या' असे म्हणतात.

३. भारताचा 'राष्ट्रीय वृक्ष' म्हणून वडाच्या झाडाला ओळखतात.

४. वड उन्हाळ्यात भरपूर प्रमाणात पाणी बाष्प स्वरूपात बाहेर टाकतो.

५. हिंदू धर्मातील स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची पूजा करतात.

६. वडाच्या झाडापासून मिळणारे लाकूड मजबूत आणि लवचिक असते.

७. वडाचे झाड भारताबरोबरच पश्चिम बंगाल, पाकिस्तान आणि बांग्लादेशात आढळते.

**प्र ३.** १. अक्षयवृक्ष २. पिंपळ, उंबर ३. प्राणवायूची
४. गोंद ५. अक्षयस्थान

**प्र ४.** १. झाड २. आयुष्य ३. महिला
४. भूमी ५. पर्जन्य, वर्षा ६. खग
७. देव

**प्र ५.** १. कमी २. अनावश्यक ३. एक
४. अपवित्र ५. कमी ६. अशुद्ध
७. जाड

**प्र ६.** १. अनेकवचन २. अनेकवचन ३. एकवचन
४. अनेकवचन ५. एकवचन ६. अनेकवचन
७. एकवचन

**प्र ७.** १. तुळस २. कडुनिंब ३. पुदिना
४. चंदन ५. कोरफड

**प्र ८.** १. पूर्तता करणे. - पूर्ण करणे.
अडचणीच्या प्रसंगी काकांनी अनिलची फी भरून पूर्तता केली.

२. जपवणूक करणे. - सांभाळ करणे
आमच्या घरासमोरील रामूकाका झाडांची अगदी प्रेमाने जपवणूक करतात.

३. पूजनीय होणे. - आदरणीय होणे.
आईने लहानपणापासून काढलेले कष्ट पाहून सुगंधासाठी आई नेहमीच पूजनीय असे.

## ९ भरजरी ग पितांबर

### ✦ काव्य/गाण्याचा परिचय

- एकदा कृष्णाच्या बोटाला (फळ कापताना) लागते. तेव्हा नारदमुनी तेथे असतात; ते सुभद्रा कृष्णाची सख्खी बहीण हिला तिची साडी फाडून चिंधी बांधण्यास सांगतात; पण ती नकार देते. तेथे द्रौपदी देखील असते. ती क्षणाचाही विलंब न करता आपल्या साडीची चिंधी फाडून कृष्णाच्या बोटाला बांधते; कारण कृष्णाचे सख्खे नाते नसतानाही वस्त्रहरणाच्या वेळी द्रौपदीची भर मंडपात लाज राखली होती. त्याचे ऋण न फेडण्यासारखेच आहे. त्या क्षणाची ती आठवण काढत बहीण-भावाच्या प्रेमाचे नाते अनमोल मानते. ही सर्व कथा गाण्याच्या रूपात वर्णिलेली आहे.

### ✦ उद्‌देश

- रक्षाबंधन या भावाबहिणीच्या पवित्र सणामागील एक पारंपारिक कथा विद्‌यार्थ्यांना समजवणे.
- महाभारताविषयी विद्‌यार्थ्यांना ओळख देणे.
- पारंपारिक कथा विद्‌यार्थ्यांना समजणे.

### ✦ अध्यापन कृती

- कविता/गाणे समजण्यापूर्वी विद्‌यार्थ्यांना महाभारत त्यातील पात्र द्रौपदी वस्त्रहरण याची ओळख करून द्‌यावी.
- कविता शिकवण्यापूर्वी कवितेतील आशय कथारूपाने विद्‌यार्थ्यांना सांगावी. कवितेचा अर्थ, कठीण शब्दांचा अर्थ समजवावा. कवितेखालील स्वाध्याय करून घ्यावा.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. एकदा कृष्ण, सुभद्रा आणि द्रौपदी राजमहालात बसले होते. नारदमुनीही तिथे होते. फळ कापत असताना कृष्णाचं बोट कापलं गेलं.

२. कृष्णाला द्रौपदीने मदत केली. कृष्णाचे बोट कापले होते. त्यावेळी तिने आपली भरजरी साडी फाडून त्याची चिंधी कृष्णाच्या बोटाला बांधली होती.

३. कृष्णाचे बोट कापले गेले त्यावेळी सुभद्रा, द्रौपदी, नारदमुनी तेथेच होते. नारदमुनींनी सुभद्राला साडीची चिंधी फाडून कृष्णाच्या बोटाला बांधण्यास सांगितली; पण ती साडी फाडण्यास तयार नव्हती. तेव्हा द्रौपदीला कृष्णाने तिला वस्त्रहरणाच्या प्रसंगी केलेली मदत आठवली. कृष्णाचे कापलेले बोट व त्यातून येणारे रक्त बघून क्षणाचाही विलंब न करता तिने आपली भरजरी साडी फाडून कृष्णाच्या बोटाला त्याची चिंधी बांधली.

**प्र २** १. वरील गाण्यात कृष्ण व द्रौपदीच्या बहीण-भावाच्या नातेसंबंधाचे वर्णन केलेले आहे.

२. कृष्ण हा द्रौपदीचा मानलेला भाऊ होता.

३. सुभद्रा ही कृष्णाची सख्खी धाकटी बहीण होती.

४. कृष्णाचे बोट कापले गेलेले होते.

५. कृष्णाच्या जखमेवर द्रौपदीने आपल्या भरजरी साडीची चिंधी फाडून बांधली.

६. श्रीकृष्ण द्रौपदीच्या हाकेला धावून गेला.

७. 'भरजरी गं पितांबरी' या कवितेतून हे नातं राखी या सणाचे महत्त्व दर्शविते.

**प्र ३.** १. सुभद्रा २. द्रौपदी ३. कृष्ण

**प्र ४.** १. सुभद्रा कृष्णाच्या पाठीची बहिण
विचाराया गेले नारद म्हणून
बोट श्रीहरिचे कापले ग बाई

२. प्रेमाचे लक्षण भारी विलक्षण
जैसि ज्याची भक्ती तैसा नारायण
रक्ताच्या नात्याने उपजे ना प्रेम
पटलि पाहिजे अंतरीची खुण

**प्र ५.** १. द्रौपदी बोलली, "हरिची मी कोण?"

२. पाठची बहीण झाली वैरिण!

**प्र ६.** १. भगिनी २. परमेश्वर ३. दरवाजा
४. बंधू ५. खूश, आनंदीत

**प्र ७.** १. खिन्न, दु:खी २. राग, द्वेष ३. उशीरा, साव

**प्र ८.** १. राख्या २. चिंधी ३. बोटे ४. बहिणी

## १० सन्मान

### ✦ पाठ परिचय

- आजची स्त्री ही सर्व क्षेत्रात कार्यरत आहे; पण तरीही तिला हवा तसा सन्मान मिळत नाही. स्त्रिला सन्मान मिळायलाच पाहिजे, तिचा सन्मान केलाच पाहिजे हे पटवून देण्यासाठी पाठात शिवरायांच्या काळातील कथा सांगितलेली आहे.

### ✦ उद्‌देश

- मुलगी/स्त्री यांच्या विषयी आदर निर्माण करणे.
- शिवराय त्या काळात देखील स्त्रियांचा अनादर होऊ देत नसे; त्या शिवाजी राजांची माहिती विद्‌यार्थ्यांना समजणे.
- विद्‌यार्थ्यांना नैतिक मूल्यांची शिकवण देणे.

### ✦ अध्यापन कृती

- समाजात स्त्रियांनी प्रगती करून आपले स्थान प्रस्तापित केले आहे हे समजवताना राणी लक्ष्मीबाई, आनंदीबाई गोपाळ, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी अशासारख्या स्त्रियांची उदाहरणे देऊन पूर्वीच्या काळी स्त्रियांना शिक्षण घेण्याचीही परवानगी नसताना आजच्या काळात स्त्रिया सर्व क्षेत्रात कशाप्रकारे आपले नाव उज्ज्वल करत आहेत हे पटवून देणे.
- स्त्रियांचा/मुलींचा आदर करण्याची, तिला समाजात मानाने जगण्याचा हक्क आहे हे विद्‌यार्थ्यांच्या मनात बिंबवणे.

(पाठात वर्णन केलेली शिवरायांची कथा ह्याचा व्हिडियो उपलब्ध असल्यास दाखवू शकता.)

- पाठातील कथा विद्यार्थ्यांना प्रथम गोष्टीरूपाने सांगावी. त्यानंतर पाठ समजवावा. पाठाखालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. स्वराज्य वाढविण्यासाठी कल्याणच्या सुभ्यावर मराठ्यांनी हल्ला करून अमाप संपत्ती हस्तगत केली. त्यानंतर कल्याणच्या सुभेदाराची सुंदर सून आबाजी पंतांनी उचलून आणली व ही सुंदर भेट शिवरायांना उपहार म्हणून पाठविली. शिवाजी महाराजांना कोणत्याही स्त्रिचा अपमान केलेला खपत नसे; म्हणूनच त्यांनी आबाजी पंतांना सुनावले.

२. समाजात एक आदर्श घडवून आणणाऱ्या राजाकीय राममोहन रॉय, महर्षी कर्वे, डॉ. ॲनी बेझंट, महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले इत्यादी थोर व्यक्तींची नावे पाठात आलेली आहेत.

३. पाठातून वेगवेगळी उदाहरणे देण्याचा उद्देश हा आहे की स्त्रियांना समाजात उच्च प्रतीचा दर्जा मिळावा.

**प्र २.** १. सन्मान म्हणजे 'आदर' किंवा पूज्यभाव.

२. शिवाजी महाराज यांच्याविषयी राजकीय शत्रू औरंगजेब यांनी "शत्रूच्या आई-बहिणींची माते-प्रमाणे इज्जत करणारा जगातील एकमेव राजा." असा उल्लेख केलेला आहे.

३. शिवाजी महाराजांच्या गंगेप्रमाणे निर्मळ विचारांचे दर्शन येथे घडते.

४. शिवाजी महाराज आपल्या मावळ्यांवर व रयतेवर जीवापाड प्रेम करत असे.

५. या जगाला सुंदर बनविण्यात स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे.

६. आपण 'जागतिक महिला दिन' ८ मार्च या दिवशी साजरा करतो.

**प्र ३.** १. डॉ. आंबेडकर २. औरंगजेब
३. शिवाजी महाराज ४. महर्षी कर्वे

**प्र ४.** १. नृप २. महिला ३. आदर
४. दुनिया, विश्व ५. वागणूक ६. प्रजा
७. कथा ८. महान

**प्र ५.** १. असुरक्षित २. अनादर ३. मित्र
४. प्रजा ५. न्याय ६. अशिक्षित

**प्र ६.** १. विधूर २. पुरूष ३. मुलगी
४. महाराणी

**प्र ७.** १. स्त्रिया २. उदाहरणे ३. धडे
४. सामने ५. घरे ६. डोळे

**प्र ८.** १. कैद करणे. - बंधिस्त करणे.
भारतीय सैन्यांनी देशावर आक्रमण करणाऱ्या आतंकवादींना कैद केले.

२. परावृत्त करणे. - दूर करणे.
सीमाने रमेशला चोरी करण्यापासून परावृत्त केले.

३. चढाई करणे. - आक्रमण करणे.
शत्रू जवळ येताना बघताच भारतीय सैन्यांनी त्यांच्यावर चढाई केली.

४. मोलाचा वाटा असणे.- महत्त्वाचा भाग/हिस्सा असणे.

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यात स्वत:च्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांचा मोलाचा वाटा आहे.

५. सुनावणे. - (एखाद्या गोष्टीबद्दल) ऐकवणे.

परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे बाबांनी मनोजला चांगलेच सुनावले.

## ११ माझा गौरवशाली महाराष्ट्र

✦ **काव्य परिचय**

- पाठात महाराष्ट्र राज्याविषयची माहिती दिलेली आहे.
  - महाराष्ट्र हे नाव कसे पडले?
  - महाराष्ट्राची वैशिष्ट्ये
  - महाराष्ट्रातील शहरे व त्यातील प्रसिद्ध गोष्टी

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्याची माहिती होणे.
- महाराष्ट्रातील शहर व त्यातील प्रसिद्ध वस्तूंची विद्यार्थ्यांना माहिती मिळवून देणे.
- विद्यार्थ्यांचे ज्ञानभांडार वाढविणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून महाराष्ट्राची माहिती काढून घ्यावी.
  १. महाराष्ट्राला महाराष्ट्र हे नाव कसे पडले?
  २. महाराष्ट्राची राजधानी, उपराजधानी.
  ३. महाराष्ट्रात कोणकोणती शहरे येतात?
  ४. कोणत्या शहराची द्राक्षे प्रसिद्ध आहेत?
  ५. कोल्हापूरची कोणती गोष्ट प्रसिद्ध आहे?
  ६. महाराष्ट्रात कोणते सण साजरे केले जातात?
  ७. महाराष्ट्रात कोणते संत होऊन गेलेत?
- पाठ शिकवताना कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून विचारत पाठ शिकवावा. पाठाखालील स्वाध्याय पूर्ण करून घ्यावा.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना महाराष्ट्र व त्यातील शहरे, त्यांच्या प्रसिद्ध वस्तू, पदार्थ यांवर चित्रासहीत प्रकल्प कार्य करण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. महाराष्ट्रात सावंतवाडीची लागडी खेळणी, कोल्हापूरची चप्पल, येवल्याची पैठणी, नारायण पेठ हया साडया लावणी, पोवाडे, कोळी गीत, भारूड, वारली कला, बिद्री कला, मराठी रंगभूमी इत्यादी कला. नागपूरची संत्री, नाशिकची द्राक्षे, हापूस आंबा, मुंबाईचा वडा पाव, पुणेरी मिसळ, सातारी कंदी पेढे, कोल्हापूरचा पांढरा-तांबडा रस्सा, कोकणातले भात, मासे इत्यादी गोष्टी प्रसिद्ध आहेत.

२. महाराष्ट्राची सीमा गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक तसेच गोवा आणि दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे.

प्र २. १. महाराष्ट्र थोर व्यक्तींची व साधुसंतांची कर्मभूमी आहे.
२. महाराष्ट्राची 'मुंबई' ही राजधानी व 'नागपूर' ही उपराजधानी आहे.
३. महाराष्ट्राला कलेची जन्मभूमी म्हटले आहे.
४. कोळसानिर्मिती व अणुनिर्मित वीज या क्षेत्रात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.
५. महाराष्ट्रात सर्वात मोठा व लोकप्रिय सण गणेशोत्सव आहे.
६. महाराष्ट्रातील लोकांचा पारंपरिक वेषात स्त्रियांचा नऊवारी साडी पुरुषांचा धोतर/पायजमा आणि सदरा हा आहे.

प्र ३. १. नारायणी - नारा, राणी, नाणी
२. कलादेवतेचे - कला, देव, लाव
३. महराष्ट्र - महा, राष्ट्र, राम
४. पायजमा - पाय, जमा, माय

प्र ४. १. द्राक्षे २. संत्री ३. भात व मासे
४. कोल्हापूरी चप्प ल

प्र ५. १. शूर २. धरती ३. विश्व, जग
४. मुख्य ५. महान ६. गाणे

प्र ६. १. एक २. अप्रिय ३. उत्तर
४. शेवट ५. मृत्यू

प्र ७. १. अग्रणी २. पैठणी ३. महाराष्ट्र
४. पारंपरिक ५. ऐतिहासिक

प्र ८. १. चपला २. राजे ३. पेढा
४. माणसे ५. बँक

## १२ अशी ही दोन फुलांची कथा

### ✦ काव्य परिचय

- कवितेत दोन फुले एकाच वेलीवर जन्मून त्यांच्या जीवनप्रवासात किती अंतर आहे ह्याचे वर्णन केलेले आहे.

### ✦ उद्देश

- जीवन व मृत्यूची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
- आपले जीवन जगताना जे समोर येईल त्याचा खडतरपणे सामना करावा हे समजणे.
- आपले जीवन यशस्वी पद्धतीने जगण्यासाठी तत्पर असावे ह्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे.

### ✦ अध्यापन कृती

- एकाच आईची दोन मुले-दोघे भावंड-एक शिकून चांगल्या पदावर काम करतो-तो सुखी जीवन जगतो. दुसरा शिक्षण घेत नाही-वाईट संगत-त्यामुळे नोकरी मिळत नाही-लाचार जीवन जगतो.

अशाप्रकारच्या कथेतून विद्यार्थ्यांना जीवनाचे महत्त्व पटवून देणे व त्या कथेतील उद्देशातून कवितेपर्यंत विद्यार्थ्यांना नेणे.

- कवितेतील फुलांची कथा थोडक्यात सांगून कविता शिकवावी. कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून काढून घेण्याचा प्रयत्न करावा. कवितेखालील स्वाध्याय कार्य सोडवून घ्यावेत.

✦ **सामुहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना कविता पाठांतरासाठी देऊन ५-५ चे गट करून कविता म्हणवून घ्यावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. जसे एकाच आईची दोन मुले पण त्यांचे नशीब वेगवेगळे असते. कुणाच्या वाटयाला अगदी चांगले जीवन तर कुणाच्या वाटयाला नेहमी कष्ट व खडतर जीवन येते. त्याप्रमाणेच देवाची एक सुंदर कलाकृती म्हणजे फूल. एकाच वेलीवर फुललेली फुले पण दोघांच्या वाटा वेगवेगळया. कवी यशवंत कवितेतून सांगतात की, एक देवाच्या दारी म्हणजे देवाला वाहिले जाते तर एक शवाला वाहिले जाते. देवाला वाहिलेल्या फुलाचे निर्माल्य सुद्धा गंगामाईला प्रेमाणे अर्पण करतात. पण शवाला चढवलेली फुले पाचोळा म्हणून पाण्यात सोडली जातात. दोघांच्या भाग्यात इतके अंतर असते ते या कवितेतून फुलांच्या जीवन प्रवासाचे वर्णन केलेले आहे.

**प्र २.** १. 'अशी ही दोन फुलांची कथा' या कवितेत दोन फुलांच्या जीवनप्रवासाचे वर्णन केलेले आहे.

२. कवितेत एका फुलाचे स्थान शिवाच्या पदी व दुसऱ्या फुलाचे स्थान शवाच्या माथी आहे.

३. एका वेलीवर जन्म मिळाल्यावरही दोघांच्या भाग्यात महान अंतर होते.

४. जगान्नियंता म्हणजे ईश्वर दोन फुलांची शेवटी एकाच ठिकाणी ओळख पटली म्हणून हसला.

५. 'अशी ही दोन फुलांची कथा' या कवितेच्या कवीचे नाव 'यशवंत देव' हे आहे.

६. देवापुढचे निर्माल्य आपण गंगानदीत अर्पण करतो.

**प्र ३.** १. जन्म जरी एकाच वेलिवर, भाग्यामध्ये महान अंतर
गुळखोबरे कुणा, कुणाला मिळे पिंड पालथा।।

२. निर्माल्य कुणी मंदिरातला, अर्पियला गंगामाईला
जरा पलिकडे, स्मशानातला, पाचोळाही वाहत आला

**प्र ४.** १. ईश्वर/ जगन्नियंता    २. फुले
३. फुले

**प्र ५.** १. पुष्प, सुमन    २. पाय, चरण
३. सुगंध    ४. गोष्ट, कहाणी
५. परमेश्वर, ईश्वर    ६. प्राचीन

**प्र ६.** १. दुर्गंधी    २. राक्षस    ३. मृत्यू
४. अनेक    ५. दुर्भाग्य

**प्र ७.** १. फुले    २. वेली    ३. मंदिरे
४. कथा

**प्र ८.** १. गजरा बनविण्यासाठी.
२. देवापुढे पूजेला.
३. अत्तर बनविण्यासाठी.

४. सुगंधी अगरबत्ती बनविण्यासाठी

५. गुलाब सारख्या फुलाचा गुलकंद, गुलाबपाणी बनवला जातो.

## १३ एक महान समाजसेविका-मदर तेरेसा

✦ **पाठ परिचय**

- पाठात मदर तेरेसा यांचा जीवनप्रवास वर्णन केलेला आहे.

✦ **उद्‌देश**

- मदर तेरेसा यांच्या कार्याची विद्‌यार्थ्यांना ओळख करून देणे.
- मदर तेरेसासारख्या इतर समाजसेविकांचीही माहिती मिळवून देणे.
- विद्‌यार्थ्यांच्या मनात समाजसेवेची भावना निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- काही समाजसेवक व समाजसेविकांची नावे सांगून विद्‌यार्थ्यांकडून त्यांच्या कार्याची त्यांना असलेली माहिती काढून घेणे. हे समाजसेवक नि:स्वार्थपणे देशाची, देशातील गरीब जनतेची सेवा करत असतात हे विद्‌यार्थ्यांच्या मनात बिंबवणे. समाजसेवेची भावना त्यांच्या मनात जागृत करणे.
- आज आपण अशाच एका समाजसेविकेची माहिती घेऊन असे सांगून विद्‌यार्थ्यांना पाठ शिकवावा.

(शक्य असल्यास मदर तेरेसा यांच्यावर त्यांच्या कार्यावर आधारित व्हिडिओ दाखवू शकता.)

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. मदर तेरेसा या थोर व महान कार्य करणाऱ्या व्यक्तीला १९६२ साली भारतात द्‌वितीय सर्वोच्च मानला जाणारा 'पद्‌मश्री पुरस्कार' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या देशातील सर्वोच्च, सर्वात श्रेष्ठ आणि उच्च मानला जाणारा 'भारतरत्न' हा पुरस्कार मिळाला. १९७९ मध्ये त्यांची समाजसेवेतील कामगिरी पाहून त्यांना 'नोबेल शांतता पुरस्कार' देण्यात आला. १९८५ मध्ये त्यांना 'मेडल ऑफ फ्रीडम' हा पुरस्कार जाहीर झाला.

२. मदर तेरेसा यांनी गरीब, असहाय्य आणि वृद्‌ध लोकांच्या सेवेत स्वत:ला झोकून दिले होते. खूप प्रयत्नानंतर 'मिशनरी ऑफ चॅरिटी' ही संस्था स्थापन करण्याची परवानगी त्यांना मिळाली. मदर तेरेसा या संस्थेव्यतिरिक्त या संस्थेकडून इतर देशात व भारतामध्ये चालवल्या जाणाऱ्या शाळा, कुष्ठरोग उपचार रूग्णालय, अनाथालय, आश्रमगृह, फिरती रूग्णालये होती. त्यांच्या हस्ते सुरू केलेल्या सर्व आश्रम संस्था या सगळ्यांचा खर्च मदर तेरेसा यांना मिळालेल्या पुरस्कारामधून केला जायचा. अगदी नि:स्वार्थपणे त्या सेवा करत होत्या; म्हणूनच समाजातील सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियांना त्या एक प्रेरणास्थान वाटतात.

३. मदर तेरेसा यांनी सढळ हाताने लहान मुले ज्यांना घर नाही जे अनाथ आहेत, तसेच म्हातारी माणसे, आजारी पीडित लोक त्यांचे खाण्यापिण्याचे हाल होतात अशा लोकांना त्यांनी आपलेसे केले. दया, प्रेम, आधार परोपकार या सगळ्यांना त्यांनी सढळ हाताने मदत केली.

४. मदर तेरेसा यांच्या आईंनी त्यांना लहानपणा- पासूनच चांगली शिकवण दिली होती. त्यांच्या आईचे म्हणणे होते की जे काही मिळेल ते सर्वांनी वाटून खावे, स्वत:साठी तर सर्वच जगतात. पण दुसऱ्यांच्या सेवेसाठी जे आपले आयुष्य पणाला लावतात ते खरे महान असतात.

**प्र २.** १. मदर तेरेसा यांचा जन्म २६ जानेवारी १९१० मध्ये मसेदोनियातील स्कोपजे या गावी एका अल्बेनियन कुटुंबात झाला.

२. मदर तेरेसा यांना दार्जिलिंग देशातील गरीब लोकांना मदत करावी असा देवाचा संदेश मिळाला होता.

३. मदर तेरेसा यांच्या मते खरं जीवन जगणे म्हणजे आपण जीवन दुसऱ्यांसाठी जगलं पाहिजे.

४. गरीब असहाय्य आणि वृद्ध लोकांच्या हिताकरिता 'मिशनरी ऑफ चॅरिटी' ह्या संस्थेस परवानगी देण्यास आली.

५. समाजात कुष्ठरूग्णांना फार वाईट वागणूक दिली जात असत.

६. मदर तेरेसांना शिक्षिका म्हणून कोलकत्ता येथे पाठवण्यात झाले.

७. मदर तेरेसा यांचे ५ सप्टेंबर, १९९७ मध्ये निधन झाले.

**प्र ३.** १. समाज २. मदर तेरेसा ३. मदर तेरेसा

**प्र ४.** १. पिता २. आवड ३. गीत ४. मेहनत

५. निगा ६. उत्तम ७. स्त्री ८. जीवन

**प्र ५.** १. लहान २. श्रीमंत ३. मरण ४. दुर्लक्ष

५. कमी ६. कनिष्ठ ७. असाधारण

**प्र ६.** १. एकवचन २. अनेकवचन ३. अनेकवचन

४. अनेकवचन ५. अनेकवचन

**प्र ७.** १. परिश्रम करणे - मेहनत करणे.

वाक्य - आई-वडील आपल्या मुलाच्या चांगल्या भविष्यासाठी परिश्रम करत असतात.

२. झोकून देणे - एखाद्या कामात स्वत:ला वाहून घेणे.

वाक्य - श्रीधरने भारत देशाच्या संरक्षणासाठी सैन्यदलात भरती होऊन आपले सारे जीवन देशासाठी झोकून दिले.

**प्र ८.** १. परवानगी - परवा, रवा, नवा

२. भारतरत्न - भारत, रत्न, भात

३. परोपकार - रोप, कार, काप

## १४ वाचाल तर वाचाल

### ✦ पाठ परिचय

- पाठात वाचनाचे महत्त्व सांगितलेले आहे. इंटरनेट, मोबाईल यांच्या वापरामुळे आपण वाचनापासून कसे दूर होत चाललो आहे हे पटवून दिले आहे.

### ✦ उद्देश

- वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे.
- वाचनाचे फायदे समजावणे.
- पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर अवांतर वाचन करण्यास प्रोत्साहन देणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाविषयी रूची वाढविणे.

### ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना त्यांचा आवडता छंद कोणता? हे विचारावे. कोणत्याही विद्यार्थ्यांकडून वाचन हे उत्तर आले असता
   १. तुम्ही कोणती पुस्तके वाचली आहेत?
   २. पुस्तकांची नावे-लेखक
   ३. वाचन केल्यामुळे काय होते?
- यासारख्या प्रश्नांतून विद्यार्थ्यांचे वाचनाबाबतचे मत जाणून घेणे.
- पाठ्यपुस्तकातील 'वाचाल तर वाचाल' या पाठातून आपण वाचनाचे महत्त्व जाणून घेऊया. अशारितीने विद्यार्थ्यांना पाठ शिकवावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. पुस्तके आपल्याला ज्ञान देतात, व्यक्तीचे चरित्र्य निर्माण करायला मदत करतात, माणसाला योग्य ती दिशा दाखविण्याचे काम करतात. मनोरंजन करतात, पुस्तकांमुळेच माणसाचा सामाजिक व मानसिक विकासही होतो.

२. डॉ. आंबेडकर वाचनाचे महत्त्व असे सांगतात की "वाचाल तर वाचाल", जसे जगण्यासाठी मुलभूत गरजा महत्त्वाच्या आहेत, ज्याशिवाय जगणे अवघड आहे. वाचन त्या गरजांपैकी एक आहे.

३. पुस्तके वाचणे म्हणजे यशाचा मार्ग यासाठी पाठात बाबासाहेबांनी पुस्तकांसाठी राजगृह नावाचे घर बांधले. अब्राहम लिंकन हा पुस्तकवेडा माणूस होता त्याने शेऱ्याकडून घेतलेले पुस्तक पावसात भिजल्याने पुस्तकाची मजुरी म्हणून पुस्तक देणाऱ्याकडे काम केले. नेपोलियन बोनापार्ट यांनी वाचलेल्या पुस्तकांची यादी आजही पॅरिसमधील वस्तुसंग्रहालयात आहे. मराठीतील लेखिका पद्मा गोळे यांचा मृत्यू काही मिनिटावर असताना त्यांना उठता-बसता येता नव्हते म्हणून शेवटी पुस्तकाची एक-एक पाने फाडून वाचत असत व पुस्तक वाचत असतानाच त्या मरण पावल्या. अशी वेगवेगळी उदाहरणे दिलेली आहेत.

**प्र २.** १. आजचे विद्यार्थी पुस्तकांचा शोध घेण्याऐवाजी गुगलचा उपयोग करतात.

२. ज्ञान प्राप्त करण्यासाठी सोपा मार्ग इंटरनेट हा होय.

३. मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे.

४. पुस्तकांमुळे माणसाचा सामाजिक व मानसिक विकास होतो.

५. पुस्तके वाचल्याने भाषा सुधारते, नवीन शब्दसंग्रह वाढतो, पर्यायाने भाषेवरील प्रभुत्व वाढते.

६. 'जागतिक पुस्तक दिन' हा दिवस २३ एप्रिल ह्या दिवशी साजरा करतात.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | अन्यनसाधारण | २. | समुद्र | ३. | पुस्तकवेडा | | |
| | ४. | प्रभुत्व | ५. | सोबती | | | | |
| **प्र ४.** | १. | पुस्तक | २. | पुस्तके | | | | |
| | ३. | महात्मा फुले | | | | | | |
| **प्र ५.** | १. | कर्ण | २. | रस्ता | ३. | आयुष्य | | |
| | ४. | कथा | ५. | पुष्कळ | ६. | वृत्तपत्र | | |
| **प्र ६.** | १. | वाईट | २. | मरण | ३. | अज्ञान | | |
| | ४. | शिष्य | ५. | जुने | ६. | अपयश | ७. | शत्रू |
| **प्र ७.** | १. | एकवचन | २. | एकवचन | ३. | अनेकवचन | | |

प्र ८. १. मुलगे/मुले २. स्त्री, महिला ३. शिक्षिका
४. लेखक ५. मैत्रिण

## १५ व्याकरण

### १. वाक्य व वाक्याचे प्रकार

प्र १. १. प्रश्नार्थी वाक्य २. विधानार्थी वाक्य ३. उद्‌गारार्थी वाक्य
४. नकारार्थी वाक्य ५. होकारार्थी वाक्य

प्र २. १. माझा मित्र इतका श्रीमंत आहे!
२. रमेश आज खेळायला जाशील?
३. गरजू लोकांना सहकार्य करु नये.
४. मला फळे खायला आवडतात.
५. विक्रम साराभाई खूप बुद्‌धिमान होते.

### २. विरामचिन्हे

प्र १. १. राम म्हणाला, “मी उदया शाळेत येईन.”
२. लताने झाडाचे फूल तोडले.
३. मी तनूला बोलावले; पण ती आली नाही.
४. माझ्या बागेत जाई, मोगरा, गुलाब, झेंडू ही फुलझाडे आहेत.
५. मला आज या पुढील मुलांच्या वहया पाहिजेत: राम, शाहू, शिवा, रमेश, मंगेश
६. तु पास झाल्यास की नापास?
७. अरे वा! किती सुंदर व गोंडस बाळ आहे.

प्र २. १. ? २. ! ३. (‘ ’) (“ ”)
४. : ५. , ६. ; ७. .

### ३. अव्यय

प्र १.

| | अव्यय | प्रकार |
|---|---|---|
| १. | नित्यनेमाने | कालवाचक क्रियाविशेषण अव्यय |
| २. | शांत बसा | रितीवाचक क्रियाविशेषण अव्यय |
| ३. | रात्रीचे | कालवाचक क्रियाविशेषण अव्यय |
| ४. | ना? | प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय |
| ५. | झाडावर | शब्दयोगी अव्यय |
| ६. | न चुकता | निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यय |
| ७. | अरेरे! | केवलप्रयोगी अव्यय |
| ८. | म्हणून | उभयान्वयी अव्यय |
| ९. | येणार नाही | निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यय |
| १०. | असंख्य | संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यय |

### ४. जाहिरात लेखन

प्र १. १. विद्‌यार्थी स्वयंलेखनातून पूर्ण करतील.

### ५. संवादलेखन

प्र १. १. विद्‌यार्थी स्वयंलेखनातून संवादलेखन पूर्ण करतील.